स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आय.एस.ओ.९००१:२००० प्रमाणीत

जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामांचे (योजना) देयकाबाबत....

**वित्त विभाग,**
**जिल्हा परिषद जालना,**
**परिपत्रक क्र01/संकीर्ण-2022/प्र.क्र /अंदाज/प्रतिस्वाक्षरी/**
**दिनांक 07/06/2022 /654.**

**प्रस्तावना:-**

विकास कामाच्या बाबतीत जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभागाकडुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये प्रशासकीय मान्यता व कलम 99 अन्वये तांत्रिक मान्यतेचे आदेश निर्गमित केल्या जातात. सदर प्रशासकीय मान्यतेचे आदेशानुसार बांधकाम विषयक कामासाठी बांधकाम विभागाकडुन पुढील कार्यवाही केले जाते, मात्र बांधकाम विभागाकडुन धावते देयके/ अंतिम देयके वित्त विभागात सादर करतांना सदर देयकावर संबधित प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करणा-या खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांची प्रतिस्वाक्षरीने देयके वित्त विभागास सादर केल्या जात नाही, त्यामुळे संबधित खाते प्रमुख यांना निधी खर्चाबाबत माहिती मिळत नाही.

**परिपत्रक:-**

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार, उपरोक्त विषयी सुचित करण्यात येते की, जिल्हा परिषद कार्यालय अंतर्गत विविध योजना जसे जिल्हा वार्षिक योजना, शासन अनुदान योजना, विशेष घटक योजना, अभिकरण योजना, जिल्हा परिषद उपकर अंतर्गत दुरुस्तीचे कामे यांना योजना निहाय / काम निहाय/ मंजुर नियतव्य प्राप्त होतो. त्यानुसार विभाग नियोजन करुन योजनेची (बांधकामे,दुरुस्ती) बांधकाम विभाग, जलसंधारण विभाग, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग यांच्याकडुन अंमलबजावणी करण्यात येते, त्यानुसार संबधित विभागात बांधकाम विषयी कामाच्या प्रगती अहवाल सादर केल्या जात नाही त्यामुळे कोणते कामे पुर्ण झाले / कोणते कामे अपुर्ण आहे / किती निधी खर्च झाला, शिल्लक अनुदान किती आहे याची माहिती प्राप्त होत नाही पर्यायाने शासनास मासिक आर्थिक/भौतीक अहवाल वेळीच सादर करता येत नाही, म्हणुन विभागास सदरील योजनेच्या अंमलबजावणीचे सर्व बाबीवर नियंत्रण असने आवश्यक आहे.

आर्थिक वर्ष 2022-23 पासुन बांधकाम विभाग, जलसंधारण विभाग, ग्रामिण पाणी पुरवठा विभागाने योजना / कामे ज्या विभागाशी संबधित आहे त्या विभागप्रमुखाची वित्त विभागात देयके सादर करण्यापुर्वी आर्थिक तरतुदीवर (नियंत्रन अधिकारी) प्रतिस्वाक्षरी

Scanned with CamScanner

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आय.एस.ओ.9001:2000 प्रमाणीत

घेवुनच वित्त विभागास देयके सादर करावी. तसेच संबधित विभाग प्रमुखानी प्रतिस्वाक्षरी करतेवेळी कामनिहाय नोंदी (प्राप्त निधी, खर्च, शिल्लक, कामाची प्रगती) याबाबत नोंदी अद्यावत करुन तसा अहवाल सादर करावा. संबधित खाते प्रमुखाच्या प्रतिस्वाक्षरी शिवाय देयके वित्त विभागास या नंतर स्वीकारता येणार नाही.

सदर परिपत्रक जिल्हा परिषदेच्या zpjalna.co.in. या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जालना

प्रत,

01) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
02) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद जालना, माहितीस्वव सादर.
03) कार्यकारी अभियंता (बां.) जि.प.जा. यांना वरिल परिपत्रकाप्रमाणे कार्यवाहीस्तव.
04) कार्यकारी अभियंता (जलसंधारण) जि.प.जा. यांना वरिल परिपत्रकाप्रमाणे कार्यवाहीस्तव.
05) कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जि.प.जा. यांना वरिल परिपत्रकाप्रमाणे कार्यवाहीस्तव.
06) सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख, अंतर्गत जिल्हा परिषद जालना.
07) सर्व लेखापरिक्षक, वित्त विभाग, जि. प. जा. कार्यवाहीस्तव.
08) निवडनस्ती

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जालना

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Scanned with CamScanner